महाराष्ट्र शासन
प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org


क्रमांक : बैठक-१८२४/प्र.क्र. ३०८/प्रनिप्रा/२७ मार्च/२०२४/७०९ दिनांक : 10 APR 2024

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दिनांक २७ मार्च, २०२४ रोजी दुपारी १२:०० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक **७९व्या** बैठकीचे इतिवृत्त,-

सदरील बैठकीस प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. मुरलीधर गोंविदराव चांदेकर, ख्यातनाम शिक्षणतज्ञ, व २) डॉ. एन.एस. उमराणी, व्यावसायिक शिक्षण क्षेत्रातील ख्यातनाम तज्ञ ३) श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (दूरदृष्यप्रणालीद्वारे) व ४) श्री. महेन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, डॉ. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई आणि डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा.यांनी बैठकीच्या अनुपस्थितीबाबत नियमाप्रमाणे रजेचा अर्ज दिलेला नाही त्यानुसार त्यांना अनुपस्थित घोषित करण्यात आले.

तसेच डॉ. राजीव मिश्रा, संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई, श्री. प्रदीप जानकीराम कुमावत, सहा. परिक्षा समन्वयक, कला शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई व श्री. संदेश सावंत, प्रतिनिधी, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे हे निमंत्रित संबंधित संचालकांच्या वतीने प्राधिकरणाच्या बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

**विषय क्रमांक १ : प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२४ व २९/०२/२०२४ रोजी झालेल्या क्रमांक ७७ व ७८ व्या बैठकींचे इतिवृत्त मंजुर करण्याबाबत.**

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२४ व २९/०२/२०२४ रोजी झालेल्या क्रमांक ७७ व ७८व्या बैठकींचे इतिवृत्त मंजुर करण्यात आले. सर्व संबंधितांनी याबाबत नोंद घेण्यात यावी.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

**विषय क्रमांक २: प्राधिकरणाच्या क्रमांक ७७ व ७८ व्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल (Action Taken Report) बैठकीपुढे ठेवणे.**

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२४ व २९/०२/२०२४ रोजी झालेल्या क्रमांक ७७ व ७८ व्या बैठकीच्या इतिवृत्तांनुसार प्राधिकरण कार्यालयाद्वारे करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल खालील प्रमाणे आहे,-

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| **बैठक दिनांक : २४/०१/२०२४** | | | |
| १. | ४ | सीईटी कक्षाच्या "Creating learning / testing centres in Maharashtra for Strengthening of Common Entrance Test Cell infrastructure" या प्रस्तावाच्या मान्यतेबाबत.<br><br>*निर्देश : राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे. CLTCC तयार करण्याबाबतची संपूर्ण प्रक्रिया सविस्तर पत्रे प्राधिकरणास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.* | या संदर्भात सीईटी कक्षाद्वारे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यात आला आहे. या संदर्भात प्राधिकरणाने खालील प्रमाणे निर्देश दिले,-<br><br>i. या प्रस्तावातील संगणक व इतर साहित्य खरेदी करताना व देयक प्रदान करताना शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.<br>ii. परिक्षा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी कार्यप्रणाली सक्षम करणे,<br>iii. प्रक्रिया विहित पध्दतीने व सुरळीत करण्याकरिता SoP तयार करणे,<br>iv. कार्यपध्दती पूर्ण करण्यकारिता वेळापत्रक / कालावधी निश्चित करावी.<br>v. प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने करण्याकरिता सामज्यंस करार (MoU) तयार करुन प्राधिकरणास सादर करावा.<br>vi. संपूर्ण प्रक्रियेचा त्रैमासिक अहवाल वेळोवेळी अद्यावत करुन प्राधिकरणास सादर करणे आवश्यक राहील.<br>vii. प्रस्तूत प्रकरणी सर्व आवश्यक माहिती वेळोवेळी प्राधिकरणाच्या सर्व सदस्यांना सादर करणे आवश्यक राहील.<br>viii. प्राधिकरणाच्या सदस्यांनी सदरील केंद्राना भेट देण्याकरिता आवश्यक ती कार्यवाही सीईटी कक्षाकडून करण्यात यावी.<br><br>प्राधिकरणाच्या दिनांक २४/०१/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्देशानुसार अंमलबजावणीबाबत उपरोक्त नमूद केल्यानुसार सविस्तर सादर करावे. |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| **बैठक दिनांक : २८/०२/२०२४** | | | |
| २. | १ | प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२३ रोजी झालेल्या क्रमांक ७७ व्या बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्याबाबत | प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२४ रोजी झालेल्या ७७ व्या बैठकीचे इतिवृत्त सर्व संबंधितांना दिनांक १२/०३/२०२४ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. |
| ३. | ४ | अशोकराव माने कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील पदवी औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमास प्रवेशित कु. वैष्णवी डी. हलके या विद्यार्थिनीच्या TFWS कोटयातुन प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावाबाबत. | कु. वैष्णवी डी. हलके या विद्यार्थिनीच्या TFWS कोटयातुन प्रवेश अद्यावत करण्याबाबत प्राधिकरणाचा निर्णय राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांना दिनांक २२/०३/२०२४ रोजीच्या पत्राने कळविण्यात आले आहे. |
| ४. | ५ | सायली चॅरिटेबल ट्रस्टचे कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील थेट द्वितीय वर्ष पदवी औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमास प्रवेशित कु. प्रभात सुधाकर बागुल या विद्यार्थ्याच्या प्रवेश प्रस्तावाबाबत. | प्राधिकरणाच्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास कु. प्रभात सुधाकर बागुल हया विद्यार्थ्याच्या प्रवेशाची माहिती ऑनलाईन अद्यावत करण्याबाबत राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास तसेच, दंडात्मक कारवाईबाबत महाविद्यालयांस प्राधिकरणाच्या दिनांक २४/०३/२०२४ रोजीच्या पत्राने कळविण्यात आले आहे. |
| ५. | ६ | प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई व राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई या दोन्ही कार्यालयातील कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांच्या सेवा पुढील ११ महिन्यांच्या कालावधीसाठी मुदतवाढ प्रस्ताव मान्यतेबाबत. | प्राधिकरणाच्या निर्णयानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांची ११ महिन्याकरिता मुदतवाढ व १०% वेतनवाढ संदर्भात दिनांक १५/०३/२०२४ रोजीच्या कार्यालयीन आदेश निर्गमित करण्यात आले आहे. |
| ६. | ७(क) | ME६७९४-अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड रिसर्च, पुणे या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रवेशित विद्यार्थी कु. सोहेल गुलमोहम्मद शेख ME (Civil Engineering) या विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द करण्याची कार्यवाही करण्याकरिता. | कु. सोहेल गुलमोहम्मद शेख या विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द करण्याची कार्यवाही करण्याबाबत प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक २०/०३/२०२४ रोजीच्या पत्राने कळविण्यात आला आहे. |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ७. | ७(ख) | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रवेशित झालेल्या मात्र प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या पोर्टलवर नाव समाविष्ट न झालेल्या, परंतु महाविद्यालयात प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्राधिकरणाच्या मान्यतेबाबत | प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या पोर्टलवर नाव समाविष्ट न झालेल्या, परंतु महाविद्यालयात प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्राधिकरणाच्या मान्यतेबाबत प्राधिकरणाचा निर्णय सर्व संबंधितांना दिनांक १८/०३/२०२४ रोजीच्या पत्राने कळविण्यात आला आहे. |
| ८. | ७(ग) | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रथम वर्ष वास्तुशास्त्र या अभ्यासक्रमाचा प्रवेशित कु. वैदेही सुयोग बल्लारीकर या विद्यार्थिनीचा प्रवेश संस्थाबदल करणेबाबत. | कु. वैदेही सुयोग बल्लारीकर या विद्यार्थिनीचा प्रवेश संस्थाबदल करणेबाबत प्राधिकरणाच्या मान्यतेबाबत संबंधितांना दिनांक १९/०३/२०२४ रोजीच्या पत्राने कळविण्यात आला आहे. |
| ९. | ७(घ) | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये जी.एच.रायसोनी इंन्स्टिट्यूट ऑफ लाईफ सायन्सेस, नागपुर येथे व्यावसायिक प्रथम वर्ष पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमास प्रवेशित ६० विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत | प्राधिकरणाच्या निर्णयानुसार उक्त प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाबाबत अवगत करण्यात येईल.<br><br>न्यायालयीन प्रकरणी मा. न्यायालयाच्या आदेशानुसार अंमलबजावणी अहवाल सादर करण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात आले.<br><br>तथापि, इतर न्यायालयीन प्रकरणी पॅनलवरील वकीलांकडून प्रकरण निहाय पुनरावलोकन करण्यात यावे. त्यामध्ये वकीलांना देण्यात आलेल्या न्यायालयीन प्रकरणी प्राधिकरणाच्या बाजुने व प्राधिकरणाच्या विरोधात झालेल्या न्यायालयीन आदेशांची आकडेवारी सादर करण्यात यावी. |
| १०. | ७(ङ) | मा.प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/११/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ७(घ) मधील निर्देशानुसार संबंधित संचालकांनी सादर केलेल्या फेर पडताळणी अहवालानुसार प्रवेश मान्यतेबाबत अर्जनिहाय प्रकरणे निर्णयाकरिता सादर. | प्राधिकरणाच्या निर्णयानुसार सर्व संबंधितांना दिनांक १८/०३/२०२४ व १९/०३/२०२४ रोजीच्या महाविद्यालय-निहाय स्वतंत्र पत्राद्वारे कळविण्यात येत आहे. |
| **<u>बैठक दिनांक : २९/०२/२०२४</u>** | | | |
| ११. | १ | प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २९/०२/२०२४३ रोजी झालेल्या क्रमांक ७८ व्या बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्याबाबत | प्राधिकरणाच्या दिनांक २९/०२/२०२४ रोजी झालेल्या ७८ व्या बैठकीचे इतिवृत्त सर्व संबंधितांना दिनांक १२/०३/२०२४ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १२. | २(क) | डॉ.एन जे पाऊलबुधे कॉलेज ऑफ एज्युकेशन, अहमदनगर महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी बी.एड अभ्यासक्रमासाठी उर्वरित प्रवेशित २३ विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबतच्या | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील डॉ.एन जे पाऊलबुधे कॉलेज ऑफ एज्युकेशन, अहमदनगर येथील बी.एड. अभ्यासक्रमासाठी प्रवेशित २३ विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी प्राधिकरणाचा निर्णय दिनांक १८/०३/२०२४ रोजीच्या पत्राने संबंधितांना कळविण्यात आला आहे. |
| १३. | २(ख) | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये स्व खातिजा कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड), पालघर येथे बी.एड अभ्यासक्रमास प्रवेशित ११ विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत. | प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत उपस्थित राहण्याबाबत प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक १८/०३/२०२४ रोजीच्या पत्राने कळविण्यात आला आहे. |

**विषय क्रमांक ३ :** **सन २०२४-२५ साठी प्रवेश नियामक प्राधिकरणाचे (सीईटी कक्षासह) अर्थसंकल्पीय अदांजपत्रक अवलोकनार्थ व मान्यतेकरिता सादर करणे.**

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २५/११/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ४(ग) अन्वये महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम २(क), ९(१) व १०(२) नुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश कक्ष या दोन्ही विभागांचे आर्थिक वर्ष २०१५-१६ ते २०२१-२२ साठीचे एकत्रित लेखे सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी प्राधिकरणास सादर केले. या संदर्भात सांगोपांग चर्चा करुन सदरील लेख्यांची नोंद घेण्यात आली **(प्रपत्र-अ)** . तसेच आर्थिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ चे आर्थिक लेखे प्राधिकरणास तात्काळ सादर करण्यात यावेत.

तसेच मागील बैठकीत प्राधिकरणाने दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने सन २०२४-२५ साठी प्रवेश नियामक प्राधिकरणाचे (सीईटी कक्षासह) अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक अवलोकनार्थ सादर करण्यात आले **(प्रपत्र-ब)**. यावर साधक-बाधक चर्चा करुन सदरील अंदाजपत्रक तत्वत: मान्य करण्यात आली. तसेच खालील निर्देश देण्यात आले,-

- ✓ सादर करण्यात आलेल्या अदांजपत्रकाबाबत नेटकेपणा येणाच्या दृष्टीने काही लेखा शिर्षाबाबत फेरविचार करुन अद्यावत अदांजपत्रक प्राधिकरणासमोर अवलोकनार्थ सादर करण्याचे निर्देश दिले.
- ✓ आगामी आर्थिक वर्षात अदांजपत्रकात दर्शविलेल्या तरतूदींनुसार शासकीय नियमांचे पालन करुन कार्यवाही करण्यात यावी.

प्रस्तूत प्रकरणी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी कार्यवाही करुन अहवाल प्राधिकरणास सादर करावा.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

विषय क्रमांक ४ : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर उच्च व कला शिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेश मान्यते प्रकरणी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी सादर केलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांवर निर्णय घेणे (M.Ed., B.Ed. and Fine Art).

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे व संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अखत्यारितील महाविद्यालय/अभ्यासक्रम निहाय प्राप्त झालेल्या अहवालांचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) मधिल तरतूदींनुसार प्रवेश बंद दिनांकानंतर संचालकांच्या तपासणी अहवालासह विहित पध्दतीनुसार सादर केलेल्या उच्च शिक्षण व कला शिक्षण विभागांतर्गत अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांची माहिती खालील प्रमाणे आहे,-

| Sr. | Name of the Course | Cut-off-date | Total No. of Colleges | Total AAP Submitted | No. of Proposals yet not submitted | Submitted for approval as ripe for March 2024 | Total admitted candidates | No. of Recommended admissions | No. of not recommended admissions | No. of admissions cancelled |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) | (11) |
| A) Higher Education | | | | | | | | | | |
| 1. | M.Ed. | 20/10/2023 | 51 | 46 | 05 | 46 | 969 | 937 | 25 | 07 |
| 2. | B.Ed. | 27/10/2023 | 466 | 456 | 10 | 456 | 29636 | 29539 | 62 | 35 |
| | Total (A) | | 517 | 502 | 15 | 502 | 30605 | 30476 | 87 | 42 |
| B) Art Educaton | | | | | | | | | | |
| 3. | BFA – Bachelor of Fine Arts | 29/10/2023 | 11 | 11 | 0 | 11 | 626 | 623 | 01 | 02 |
| | Total (B) | | 11 | 11 | 00 | 11 | 626 | 623 | 01 | 02 |
| | Total (A+B) | | 528 | 513 | 15 | 513 | 31231 | 31099 | 88 | 44 |

महाविद्यालयांनी सादर केलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांबाबत व प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर केलेल्या महाविद्यालयांबाबत अवलोकन करुन खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहे,-

१) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १६ नुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्रवेश नियामक प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" सादर करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक १४/०९/२०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात आलेले आहे,

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

२) शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक एडीआर-२०२४/प्र.क्र.१९/तांशि-६, दिनांक ०५/०३/२०२४ रोजी च्या पत्रान्वये "कला शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय / अशासकीय अनुदानित / अशासकीय अनुदानित अल्पसंख्याक संस्थामधील शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ व त्यापुढील प्रवेशांची पडताळणी आणि प्रवेश मान्तया प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून देण्यात येऊ नये" असे कळविले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला.

३) ज्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश संख्या ० (शुन्य) आहे, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क आकारणीबाबत संबंधित संचालक यांनी अभिप्राय सादर करावेत व सदर अभिप्रायाच्या अनुषंगाने सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

४) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील उच्च व कला शिक्षण विभागाअंतर्गत विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी मागील वर्षाप्रमाणे ०१ टक्के प्रवेश मान्यता प्रस्तावांची निवडक पध्दतीने प्रत्यक्ष छाननी व पडताळणी करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक ८/०१/२०२४ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये उपसमिती गठित करण्यात आली आहे.

५) अधिनियम २०१५ मधील तरतदूींच्या अनुषंगाने संचालकांनी सादर केलेल्या अहवालानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर उच्च व कला शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सादर केलेल्या तपासणी/पडताळणी अहवालानुसार ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत व प्राधिकरणाने विहित कलेल्या "प्रक्रिया शुल्काचा" भरणा केलेला आहे. अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला, सदरील संचालनालय/अभ्यासक्रम **(प्रपत्र-क/महाविद्यालय-निहाय)** प्रवेश मान्य करण्यात येत आहे.

तथापि, ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी आढळलेल्या आहेत असे प्रवेश अमान्य करण्यात येत आहेत. या अमान्य प्रवेशा संदर्भात हितसंबंधीत घटक मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(झ) मधील निर्णयानुसार पुनर्विलोकन याचिका विहित पध्दतीनुसार सादर करु शकतील.

६) उच्च व कला शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरण स्तरावर निवडक पध्दतीने करण्यात येणाऱ्या १% प्रवेश पडताळणी प्रक्रियेचा अहवाल प्राधिकरणास अप्राप्त असल्याने प्रवेशित विद्यार्थ्यांची मान्यता १ टक्के पडताळणी उपसमितीच्या अहवालाच्या अधीन राहुन देण्यात येत आहे. तथापि सदरील अहवालानुसार या विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत (पात्र/अपात्र) प्राधिकरण स्तरावर तदनंतर कार्यवाही करण्यात येईल, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी. उपसमितीने यासंदर्भात अहवाल प्राधिकरणास त्वरीत सादर करण्याबाबत निर्देश देण्यात येत आहे.

७) प्रस्तूत प्रकरणी वरील परिच्छेद क्रमांक (६) मध्ये नमूद केल्यानुसार १% निवडक पध्दतीने तपासणी / छाननी करण्याकरिता गठित करण्यात आलेल्या उपसमितीचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील ज्या महाविद्यालयातील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे **(प्रपत्र-क)**, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या प्रवेश मान्यतेचे पत्र निर्गमित करण्याबाबत मागील वर्षाप्रमाणे (शैक्षणिक वर्ष २०२२-२३ नुसार) कार्यवाही करावी.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

८) ज्या महाविद्यालयांनी अधिनियम २०१५ च्या कलम ९(५) च्या तरतूदींनुसार विहित केलेल्या कालावधीमध्ये प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर केलेले नाहीत, अशा सर्व महाविद्यालयांना प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करण्यासाठी १५ दिवसांची संधी देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. यासंबंधी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी संबंधित संचालकांमार्फत संबंधित महाविद्यालयांना कळविण्याचे निर्देश देण्यात आले. याबाबतचा सविस्तर तपशील प्रपत्र-ड द्वारे सोबत जोडला आहे.

विषय क्रमांक ५: मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.

(क) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील स्व.खातिजा कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड), पालघर महाविद्यालयातील बी.एड अभ्यासक्रमासाठी प्रवेशित ११ विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.

प्रस्तूत प्रकरणी सुनावणी घेण्यात आली व सदरील सुनावणीस महाविद्यालयाच्या वतीने डॉ. निलिमा कनगे, प्र. प्राचार्य हे उपस्थित होते. सुनावणी दरम्यान उपस्थितांनी त्यांचे म्हणणे प्राधिकरणास सादर केले.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये स्व. खातिजा कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड), पालघर येथे बी.एड अभ्यासक्रमास प्रवेशित १०० विद्यार्थ्यांपैकी एकूण ८९ विद्यार्थ्यांना प्राधिकरणाच्या दिनांक ३०/१२/२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये प्रवेश मान्यता देण्यात आली. उर्वरित ११ विद्यार्थ्यांच्या प्रवेशामध्ये संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या अहवालानुसार ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी दर्शविण्यात आल्याने प्राधिकरणाची प्रवेश मान्यता देण्यात आली नाही.

संबंधित महाविद्यालयाने दिनांक ०८/०२/२०२२ रोजी पुनर्विलोकन अर्ज सादर केला, या संदर्भात दिनांक २३/०३/२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली. मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या दिनांक २४/०६/२०२२ रोजीच्या आदेशान्वये संबंधित महाविद्यालयाने विहित कालावधीमध्ये पूर्ण व योग्य कागदपत्रे सादर न केल्याने पुनर्विलोकन याचिका रद्द करण्यात आली.

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०९/२०२२ व १५/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, पुणे यांना पुनश्च पडताळणीकरिता कळविण्यात आले. सदर महाविद्यालयाचा अहवाल प्राधिकरण कार्यालयात प्राप्त न झाल्यामुळे प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२३ रोजीच्या विषय क्रमांक ४(ड) मधील निर्णयान्वये सदर महाविद्यालयातील प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता नाकारण्यात आली होती.

तद्नंतर संबंधित महाविद्यालयाने प्राधिकरणाकडे दिनांक ४/१०/२०२३ रोजी प्रवेश मान्यतेसाठी फेरविचार करवा अशी विनंती सादर केली. प्रस्तूत प्रकरणी संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या दिनांक २७/०९/२०२३ रोजीच्या अहवालामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे,-

| Sr. No. | Name Of The Candidate | Discrepancy | Director's Remark |
|---|---|---|---|
| 1 | Ajit Dasharath Jadhav | Tribe Validity Certificate Pending | Certified |
| 2 | Akanksha Vasant Atkari | Upload All Marksheet for Calculation Of percentage. | Certified |
| 3 | Ashvini Rahul Borase | NCL pending | Certified |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| Sr. No. | Name Of The Candidate | Discrepancy | Director's Remark |
|---|---|---|---|
| 4 | Dhiraj Laxman Satvi | CVC pending | Admission Cancelled At College Level |
| 5 | Mamata Raghunath Satvi | NCL pending | Certified |
| 6 | Ram Shida Govind | Upload All Marksheet for Calculation of percentage | Certified |
| 7 | Sonali Lasha Sambar | Upload All Marksheet for Calculation of percentage | Certified |
| 8 | Sushmita Sarkar | Upload All Marksheet for Calculation of percentage | Certified |
| 9 | Suvarna Jitendra Patil | Application Form Of CET-2020 pending, CVC & NCL Pending. | Certified |
| 10 | Swapnil Lasha Sambar | Upload All Marksheet for Calculation of percentage | Certified |
| 11 | Ujjwala Tukaram Botkundale | CVC & NCL pending | Certified |

सदरील विद्यार्थ्यांचे प्रवेशांना संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी शिफारस केली नव्हती, परंतू संचालकांच्या पुन:श्च पडताळणीअंती कागदपत्रांची पूर्तता झाल्याने त्यांनी पात्रतेची शिफारस केली आहे. विद्यार्थी हित लक्षात घेता अशा समप्रकरणी दिलेल्या निर्देशानुसार संबंधित संस्थेस दंड आकारुन प्रवेशांना मान्यता देणेबाबत विचार करणेसाठी प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीसमोर मान्यतेकरिता सादर करण्यात आले.

वरील बाबी विचारात घेता संचालनालय, उच्च शिक्षण पुणे यांच्या अहवालास अनुसरुन सदरील ११ विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तथापि, प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाकडून झालेल्या गैरप्रकार/निष्काळजीपणाबाबत संबंधित महाविद्यालयास रुपये १ लाख दंड आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा " 60249481321" (IFSC Code : MAHB0000310) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(ख) **शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील शहापुर तालुका एज्युकेशन सोसायटीचे, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शहापुर महाविदयालयातील बी.एड मधील कु.अश्विनी भगवान शिद हिच्या प्रवेश मान्यतेबाबत.**

प्रस्तूत प्रकरणी सुनावणी घेण्यात आली व सदरील सुनावणीस महाविद्यालयाच्या वतीने डॉ. संदीप मगर, प्र. प्राचार्य व कु. अश्विनी शिद संबंधित विद्यार्थीनी हे उपस्थित होते. सुनावणी दरम्यान उपस्थितांनी त्यांचे म्हणणे प्राधिकरणास सादर केले.

शहापूर तालुका एज्युकेशन सोसायटीचे, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शहापूर महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील बी.एड अभ्यासक्रमातील प्रवेशित कु.अश्विनी भगवान शिद यांची प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २२/०२/२०१८ रोजीच्या बैठकीत "जात वैधता प्रमाणपत्राची" त्रुटी दर्शविण्यात आली होती.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

सदर महाविद्यालयाने प्राधिकरण कार्यालयात पुनर्विलोकन याचिका सादर केली होती. त्यानुसार दिनांक २३/०३/२०२२ रोजी सुनावणी झाली. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २४/०६/२०२२ रोजीच्या निर्णयान्वये सदरची याचिका रद्द करण्यात आली.

या संदर्भात असे निर्दशनास येते की, सदरील विद्यार्थीनीचा सीईटी अर्जात एस.टी. प्रवर्गाचा उल्लेख केला होता. परंतू प्रवेशाच्या वेळी जात वैधता प्रमाणपत्र सादर करु शकली नाही. विद्यार्थीनीचा प्रवेश Allotted Category OPEN असल्याचे प्रवेशित यादीत नमूद आहे. विद्यार्थीनीस एकुण ५४.०५% मार्क आहेत.

सदर विद्यार्थीनीचा प्रवेश तिसऱ्या फेरीमध्ये खुल्या प्रवर्गातील जागेवर झालेला आहे. तसेच विद्यार्थीनीने दिनांक १०/०५/२०१८ रोजी जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याचे दिसुन येते. उपरोक्त महाविद्यालयाने कु.अश्विनी भगवान शिद यांच्या प्रवेशास मान्यात मिळण्याबाबत विनंती कली आहे.

वरील बाबी विचारात घेता शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील व्यावसायिक बी.एड. अभ्यासक्रमास प्रवेशित कु.अश्विनी भगवान शिद यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तथापि, प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाकडून झालेल्या गैरप्रकार/निष्काळजीपणाबाबत संबंधित महाविद्यालयास रुपये १ लाख दंड आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा " 60249481321" (IFSC Code : MAHB0000310) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(ग) <u>श्री. छत्रपती राजे संभाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक बी.एड. अभ्यासक्रमास प्रवेशित ०२ विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी.</u>

प्रस्तूत प्रकरणी सुनावणी घेण्यात आली व सदरील सुनावणीस महाविद्यालयाच्या वतीने श्री. योगेश वी. खैरनार, लिपिक हे उपस्थित होते. सुनावणी दरम्यान उपस्थितांनी त्यांचे म्हणणे प्राधिकरणास सादर केले.

उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या दिनांक २८/०२/२०२४ रोजीच्या अहवालानुसार श्री.छत्रपती राजे संभाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव महाविद्यालयातील प्रवेशित कु. समाधान अशोक पाटील आणि कु. संग्राम संजय सुर्वे या विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी OBC प्रवर्गातुन अर्ज सादर केलेला असुन Allotted Category अनुक्रमे OBC आणि NT-२ (NT-C) आहे.

सदर विद्यार्थ्यांचा प्रवेश प्रथम फेरीमध्ये झालेला असुन त्यांच्याकडे प्रवेशावेळी जात-वैधता प्रमाणपत्र नसताना जात वैधता पडताळणी समितीकडे सादर प्रस्तावाचे टोकन पावतीच्या आधारे महाविद्यालयाने त्यांना प्रवेश दिलेला आहे. उक्त विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र उशिराने अनुक्रमे दिनांक ०८/०७/२०२१ व दिनांक ०३/०५/२०२१ रोजी प्राप्त झाले असुन त्याबाबतची वस्तुस्थिती नमुद करुन संचालनालयाचे दिनांक १३/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्राधिकरणास अहवाल सादर केलेला त्यात कोणतेही बदल नाही.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी सदर दोन विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत प्राधिकरण स्तरावर उचित निर्णय घेण्याबाबत विनंती केली आहे.

वरील बाबी विचारात घेता शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक बी.एड. अभ्यासक्रमास प्रवेशित कु. समाधान अशोक पाटील आणि कु. संग्राम संजय सुर्वे यांच्या प्रवेशास विद्यार्थी हित लक्षात घेऊन प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तथापि, प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाकडून झालेल्या गैरप्रकार/निष्काळजीपणाबाबत संबंधित महाविद्यालयास रुपये १ लाख दंड आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा " 60249481321" (IFSC Code : MAHB0000310) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी विषयाची तातडी लक्षात घेता, बैठकीचे इतिवृत्त मंजूरीची वाट न पाहता बैठकीमध्ये झालेल्या ठरावानुसार यापुढे कार्यवाही त्वरीत करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच बैठकीचे इतिवृत्त निर्गमित झाल्यानंतर प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील सर्व संबंधीत विभागानी त्यांच्याशी संबंधीत प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत प्राधिकरणास त्वरीत सादर करावा. या संदर्भात अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण व प्रशासकीय अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे दोन्ही विभागातील संबंधीत विभागांना बैठकीचे इतिवृत्त उपलब्ध करुन देतील, याबाबत कृपया नोंद घ्यावी.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया करण्याकरिता संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे, संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई आणि प्राधिकरण कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी परिपूर्ण माहिती/अहवाल सादर केलेले आहेत, या त्यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे. बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**(जे.पी. डांगे)** भा.प्र.से.
**अध्यक्ष,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण तथा**
**माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.**

दिनांक :